वर्ष : १४ ❑ अंक : ४
सौर चैत्र, शके १९३७
(मार्च, २०१५)
वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान संतुलन

संपादक : दिलीप कुलकर्णी

ग.सं.च्या सर्व वाचकांना नवीन सौर शकाच्या हार्दिक शुभेच्छा!

## देशभक्ती : झापडबंद आणि व्यापक

ग.सं.चे एक वाचक कर्नल जयंतराव चितळे ह्यांनी मध्यंतरी एक पत्र पाठवलं आहे. कर्नल चितळे हे निवृत्त सैन्याधिकारी आहेत, आणि पुण्यात 'महाराष्ट्र मिलिटरी फाउंडेशन' ही संस्था चालवतात. 'मेक इन इंडिया : लुटारूंसाठी पायघड्या' हे सौर पौषाच्या (डिसेंबर '१४) अंकाचं संपादकीय वाचून त्यांनी हे पत्र पाठवलं आहे. ते म्हणतात : 'हे संपादकीय अत्यंत योग्य; परंतु, प्रगतीची घोडदौड करत असलेला चीन तेथे परदेशी कंपन्यांना उत्पादन का करू देतो; तेथे परदेशी कंपन्यांवर काय निर्बंध/नियम आहेत, इत्यादि ज्ञान माझ्यासारख्यांना ग.सं.मधून कृपया द्यावे. गांधी-नेहरूंपासून ते भागवत-मोदी ते तुम्ही-मी सर्वच कट्टर देशभक्त आहोत. फरक फक्त आहे गतिमान प्रगतीकरिता विविध पर्यायांपैकी कोणता मार्ग ध्यायचा हा. १००% स्वदेशी प्रत्येकालाच निश्चित आवडेल. 'मेक इन इंडिया' ह्या गोंडस trapने प्रगत तंत्रज्ञान प्राप्त करून 'मेड इन इंडिया', आणि नंतर 'इन्व्हेंटेड इन इंडिया' असे तीन पायऱ्यांचे धोरण साध्य करणे अशक्य वाटत नाही. ग.सं.ने कृपया ह्यावर विचार करावा.'

—कर्नल चितळे ह्यांच्या कार्याविषयी आदर असूनही त्यांच्या प्रत्येक विधानाला मला विरोध करावासा वाटतो. त्या विरोधाची कारणं स्पष्ट करण्यासाठी हा लेख.

प्रथमत: 'चीन' हा विषय घेऊ. गेली काही दशकं चीन करीत असलेल्या प्रगतीचं आकर्षण सर्व जगाला आहे : विकसनशील देशांना तर विशेषच. चीन कशा तऱ्हेनं प्रगत होत आहे हे पाहिलं, तर हे आकर्षण आत्मघातक/सर्वनाशक आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. चीनचा 'विकास' हा विकासाच्या प्रचलित प्रतिमानानुसारच—संसाधनं संपवत, प्रचंड प्रदूषण करत, निसर्गाची प्रचंड हानी करत—कसा चालू आहे; तो 'विनाश'च कसा आहे (इतर देशांप्रमाणेच), हे प्रत्यक्ष पुराव्यांतून दाखवणारी, २ वर्षांपूर्वीच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'मधल्या एका लेखातली माहिती इथे प्रस्तुत करत आहे. (China's Achilles Heel Is Pollution, Nayan Chanda, TOI, 16 March, 2013) :

चीनच्या 'भरधाव' (breakneck) वाढीचे दुष्परिणाम :

(१) जानेवारी '१३ मध्ये ३० चिनी शहरं विषारी धुक्यात गुरफटलेली होती. बीजिंगचा हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक (Air Quality Index) ७५५वर पोहोचला. (३००= आरोग्याला हानीकारक हवा.)

(२) चीनचा प्रदूषणजन्य विकारांवरचा उपचारखर्च सतत वाढत आहे. फुप्फुसांच्या कर्करोगाचं बीजिंगमधलं प्रमाण गेल्या १० वर्षांत ६०%नं वाढलं आहे. (धूम्रपानात वाढ नसूनही).

(३) विश्वबँकेचा अभ्यास असं दाखवतो की, चीनच्या ५६ कोटी शहरी लोकसंख्येपैकी ९९% जनता ही युरोपीय मानकांनुसार असुरक्षित हवेत श्‍वसन करते.

(४) चीनचं भूशास्त्रीय सर्वेक्षण असं सांगतं की, ५०% चिनी शहरांमधलं भूजल प्रदूषित आहे. (पैकी २/३ ठिकाणचं 'अत्यंत प्रदूषित'.) कोळसा आणि रासायनिक उद्योगां-मधील सांडपाण्यामुळे नद्या-नाले निरुपयोगी बनले आहेत. त्यांतील मासे मोठ्या प्रमाणावर मेले आहेत.

(५) पेय-जलाची उपलब्धता ही बिकट समस्या बनलेली आहे. जगातली २०% लोकसंख्या चीनमध्ये आहे; तर पेयजल केवळ ७%. चिनी उद्योग हे विकसित देशांच्या पेक्षा ३ ते १० पट अधिक पाणी वापरतात.

(६) अनिर्बंध उद्योगीकरण आणि रासायनिक द्रव्यं कुठेही फेकून देणं ह्यांमुळे जमिनी आणि पिकं विषारी बनली आहेत. १०% भातपिकात अतिरेकी प्रमाणात कॅडमियम हा विषारी धातू आहे.

(७) मध्यंतरी चीननं आपला (GDP)-विकासदर हा पार्यावरणिक खर्च समाविष्ट करून निश्चित करण्याचं ठरवलं. पण, जेव्हा १०% विकासदर हा त्यामुळे ७%वर येतो असं दिसलं, तेव्हा तो प्रयत्न सोडून देण्यात आला.

(८) भारत हा कैक दशकांनी चीनच्या मागे आहे; तथापि भारतातलं ७०% भूपृष्ठजल हे प्रदूषित आहे; सुमारे १८० शहरांतली हवा अत्यंत प्रदूषित आहे.

—दिलीप कुलकर्णी ह्या माणसाला 'अतिरेकी' ठरवून त्याच्याकडे काणाडोळा करणं सोपं आहे; पण, टाइम्ससमधल्या ह्या माहितीकडेही आपण डोळेझाक करणार का? कर्नलसाहेब, भारतानंही अशीच 'घोडदौड' (!) करावी, अशी आपली इच्छा आहे का? चीनमध्ये प्रदूषणावर कोणतेही निर्बंध नाहीत; मानवाधिकार वगैरे 'विकासाला अडथळा ठरणाऱ्या' बाबी नाहीत : मग परदेशी उद्योग तिथे न जातील तरच नवल. 'क्योतो करारा'चा फायदा युरोपीय देशांनी धूर्तपणे करून घेतला, तो आपापल्या देशांतले प्रदूषणकारी उद्योग चीन-भारतात हलवून. ही म्हणे 'तुमच्या विकासाकरिता मदत'! ह्यातून युरोपीय देश, अमेरिका, इ.चा कर्बोत्सर्ग आणि अन्य प्रदूषण घटलं; पण, चीन-भारताचं वाढलं! 'मेक इन इंडिया' ह्याचा अर्थ आत्मनाशाच्या स्पर्धेत आता आम्हीही चीनशी बरोबरी करणार आहोत! चिनी प्रतिमानानुसारच आता आमचाही 'विकास' होणार आहे!

दुसरा मुद्दा 'प्रगत तंत्रज्ञाना'चा. त्या बाबतचं वास्तव असं आहे की, कोणताही विकसित देश आजच्या घडीचं तंत्रज्ञान दुसऱ्याला देत नाही : ते कायमच मागास असतं. (लष्करी साहित्याबाबतही हेच घडतं, हे कर्नलसाहेब जाणतातच.) कमी ऊर्जा वापरणारं, कमी प्रदूषण करणारं तंत्रज्ञान ते स्वत:कडे ठेवतात, नि ऊर्जाभक्षक, प्रदूषक असं दुय्यम तंत्रज्ञान आपल्याला देतात. आपल्याकडच्या सध्याच्या तंत्रज्ञानापेक्षा ते चांगलं असेलही; पण, ते काही state of the art प्रकाराचं नव्हे. कठोपनिषदातला नचिकेत्याला बाप भाकड गायी दान करत होता, तशातलाच हा प्रकार असतो. आम्ही आमची जमीन त्या उद्योगांच्या घशात घालणार आहोत; त्यांना वाटेल तेवढं पाणी वापरू देणार आहोत (उदा. कोका कोला); वाटेल तितकं प्रदूषण करू देणार आहोत; अपघात/हानीच्या जबाबदारीतून त्यांना मोकळं करणार आहोत (उदा. यूनिअन कार्बाईड). अन् ह्यातून जो नफा मिळेल तो ते त्यांच्या मायदेशात घेऊन जाणार. दरम्यान, त्यांचे नोकर म्हणून जे भारतीय काम करतील, त्यांना भरपूर पैसे मिळाल्यानं ('विकास'!) ते इथे क्रीमी लेअरचं चंगळवादी जीवन जगू लागून इथल्या विनाशाला आणखी हातभार लावणार! ते आपल्याच बांधवांचं, आपल्याच निसर्गाचं शोषण करणार! इथेच वसाहतवाद गाजवणार! आज IT, वाहन-उद्योग, बँक, विमा, इ. क्षेत्रांतली मंडळी काय करते आहे, हे आपण बघतोच आहोत.

म्हणजे असं फक्त विदेशी उद्योगच करतील/करतात असं नाही. भारतीय उद्योगही हेच करतात. सध्या ग.सं.मध्ये जागतिकीकरणाविषयीची लेखमाला सुरू आहे, तीत ह्याचे साधार पुरावे मिळत आहेतच.

म्हणूनच ग.सं.चा विरोध हा मूलत: ह्या विकास-प्रतिमानालाच आहे. अशा तऱ्हेचं उद्योगीकरण ही मुळातच एक चूक आहे. ती व्हायलाच नको होती. असला 'विकास' हा संसाधनं संपवतच साध्य होऊ शकतो. तो प्रचंड प्रदूषण करतो. शोषण आणि वसाहतवादाशिवाय तो असंभव आहे. त्यामुळेच तो केव्हाही, कुठेही व्हायलाच नको होता. अत्यंत ऱ्हस्वदृष्टीच्या युरोपीयांनी बाटलीचं बूच उघडलं : आता सर्वनाश केल्याविना तो राक्षस थांबणार नाही. आपण म्हणता त्याप्रमाणे ३ पायऱ्यांमध्ये असा सर्वनाश (वाचा : 'विकास') साध्य करणं अशक्य नाही, हे खरंच आहे! 'मेक इन इंडिया' हा विदेशी उद्योगांनी केलेला भारताचा सर्वनाश असेल; तर, 'इन्व्हेंटेड इन इंडिया' हा देशी उद्योगांनी केलेला. पर्यावरण-नाशाच्या बाबतीत त्यांच्यात काडीचाही फरक नाही. स्वदेशी उद्योग हे 'देशभक्त' असतात हा भ्रम आहे.

मुळात 'देशभक्ती' म्हणजे तरी काय? ज्याच्या आधारे सध्याच्या आणि भावी काळातल्या पिढ्या जगणार, त्या निसर्गाचं शोषण-प्रदूषण विध्वंस करत आजची आर्थिक वाढ साध्य करणं ह्याला जर 'देशभक्ती' म्हणायचं असेल; तर, क्षमा करा : मी 'देशभक्त' नाही! अन् आपण दिलेल्या यादीच्या दुसऱ्या टोकाला जो माणूस आहे—गांधी—तोही 'देशभक्त' नव्हता!

किती संकुचित करून टाकली आहे आपण 'देशभक्ती'ची संकल्पना! GDP वाढवण्यासाठी काहीही केलं की, म्हणे ती 'देशभक्ती'! मग त्यापुढे शेकडो देशविघातक कृतींचे गुन्हे माफ! GDP वाढवण्यासाठी इथली हवा कितीही प्रदूषित करा : माफ! पाणी आटवा–संपवा–प्रदूषित करा : माफ! विविध प्रकल्पांसाठी जनजीवन उखडून टाका; लोकांना विस्थापित करा : माफ! दारिद्र्य-विषमता वाढवा : माफ! हे सगळं करणारे 'देशभक्त'; अन् त्याला विरोध करणारे 'देशद्रोही' : खासा न्याय आहे.

'देशाच्या भूमीचं रक्षण' ही संकल्पनाही अशीच संकुचित, झापडबंद बनून गेली आहे. 'आपल्या देशाची रक्षणीय भूमी म्हणजे त्याची १५,००० कि.मी.ची बाह्य सरहद्द' अशी आज आपली पक्की समजूत असते. पण, ह्या १५,००० कि.मी.-च्या सीमेच्या आत सुमारे ३३ लक्ष चौ.कि.मी. क्षेत्रफळाची जी भूमी आहे, तिच्या रक्षणाचं काय? ह्या भूमीचा सर्वांत वरचा ६ इंचांचा जो थर आहे, तो साऱ्या प्राण्यांची भूक भागवतो. सीमेच्या इंचा-इंचाच्या रक्षणासाठी आपण अब्ज-अब्ज रुपये प्रतिवर्षी खर्च करतो; पण, मातीच्या इंचांच्या रक्षणासाठी...? हा ६ इंचांचा मातीचा थर तयार व्हायला १,००० ते १०,००० वर्षं लागतात. ती उघडी राहिली, तर त्या मातीची धूप मात्र अवघ्या काही तासांच्या पावसानं होऊ शकते. आहे आपलं लक्ष ह्या भूमीच्या रक्षणाकडे? रासायनिक खतं आणि सेंद्रिय द्रव्यांचा अभाव ह्यांमुळे ह्याच भूमीचा कस सातत्यानं घटत आहे : ती निकस, नापीक, क्षारपड बनत आहे. सीमांचं रक्षण हा एकूण देशरक्षणाचा केवळ एक आयाम आहे : ह्या निकस, नापीक, होत चाललेल्या इंचाइंचाचं रक्षण ही देशभक्तीची व्यापक संकल्पना आहे. झापडबंद देशभक्तांच्या ती गावीही नाही! 'मेक इन इंडिया'मुळे भूमीचे हे इंच अक्षरश: किंवा भावश: नाहीसे होणार आहेत; पण, तरीही ती 'देशभक्ती'च! काय दुर्दैव आहे! कर्नलसाहेब, मी असा 'देशभक्त' नाही ह्याचा मला अभिमान आहे!

ते कसं होतंय, माहितीये? एखादा भव्य वाडा असावा; त्याच्या दारा-दारावर चौकीपहारे असावेत; कुणीही त्या वाड्यात शिरू शकणार नाही ह्याचा पुरता बंदोबस्त असावा; अन् दुसरीकडे तो उंदीर-घुशी-वाळवीकडून आतून पोखरला जात असावा—तसा हा प्रकार आहे. सीमांचं रक्षण म्हणजे उजाड, उद्ध्वस्त, प्रदूषित, निर्जल, निकस भूमीचं रक्षण का? चीन स्वत:ला असा 'आतून' संपवतोय. चीन मूर्खासारखा त्या दिशेत 'घोडदौड' करतोय, म्हणून आपणही तेच करायचं? आम्हीही संकुचित, ऱ्हस्व दृष्टीनंच वागायचं?—कशाला ही आत्मघातकी स्पर्धा?

अनेक जण म्हणतील : 'आपण जशास तसे वागलो नाही; तर आपण मरून जाऊ!' हे खरं आहे असं क्षणभर समजू. पण, म्हणजे, 'विकसित' होऊन आपण जिवंत राहणार आहोत की काय? दोन्ही प्रकारे मरण अटळ असेल, तर निसर्गाला जपण्यासाठी आपण मरणं हे केव्हाही श्रेयस्कर. निदान भावी पिढ्यांना तरी सुबुद्धी सुचून त्या कदाचित निसर्गस्नेही जगतील. त्यांना जगण्यासाठी निसर्ग शिल्लक तरी असेल. आपण 'विकसित' होऊ पाहू, तर निसर्गच मेल्यानं आपणही मरू आणि भावी पिढ्यांचे जीवनाधारही संपवू.

'धारणाक्षम विकास' (sustainable development) म्हणजे भावी पिढ्यांच्या उपजीविकेच्या संधी हिरावून न घेता आपली आजची उपजीविका चालवणं. भारतीय जीवनदृष्टी ही अशाच विकासाचा पक्ष घेते. देशरक्षण म्हणजे ह्या जीवनदृष्टीचं, तशा जीवनशैलीचं रक्षण. त्या मूल्यांचं रक्षण व्हावं म्हणून आक्रमकांपासून सरहद्दींचं रक्षण करायचं. पण, आमच्यावर जर विविध मार्गांनी ह्याच्या विपरीत विचारांचं आक्रमण होणारच असेल; आम्ही मनानं आणि विचारांनी अमेरिकी/चिनी बनणारच असू, तर सैन्याकरवी सीमांचं रक्षण ही निरर्थक बाब आहे. मग आम्ही नावालाच काय ते 'सार्वभौम'—अन्यथा आमच्यावर खरं राज्य परकीयांचंच : अमेरिकेचं, चीनचं, युरोपाचं, जपानचं, जागतिक बँकेचं, जागतिक नाणेनिधीचं, बहुराष्ट्रीय उद्योगांचं! आम्ही म्हणे देशाच्या 'सीमांचं रक्षण करणार'—नि इकडे 'मेक इन इंडिया'च्या नावाखाली सगळा देश ह्या लुटारूंच्या स्वाधीन करणार!

'देशभक्ती'ची झापडबंद, संकुचित संकल्पना सोडून आपण जोवर व्यापक आणि दीर्घकालीन हिताची संकल्पना स्वीकारत नाही, तोवर आपली लूट, विध्वंस अटळ आहे.

# रामायणाचा पर्यावरणीय आशय

४

**सुरेश भागवत**

*रामायणाचा आशय पर्यावरणीयही आहे असं सुचवणारी ही लेखमाला : संयमित उपभोगाच्या जीवनशैलीचा पर्यावरणीय संदेश त्यातून कसा मिळतो हे प्रतीकात्मतेच्या दृष्टिकोणातून उलगडून दाखवणारी.*

ह्या लेखात आपण, रामायणात अयोध्या, लंका व किष्किंधा ह्या तीन नगरींचे व तेथील समाजांचे जे वर्णन केलेले आहे, ते तुलनेसह पाहणार आहोत. त्याद्वारे अयोध्येचा समाज, असुर समाज व वानर समाज ह्यांच्या जीवनशैलींचे व जीवनविषयक विचारांचे स्वरूप व त्यांतील अंतर ध्यानीं येईल.

अयोध्या, लंका व किष्किंधा ह्या तिन्ही राजधान्या आहेत. त्यांच्या वर्णनांमध्ये, शब्दयोजनेमध्ये, वर्णनाच्या विस्तारामध्ये रामायणकार अंतर करतात. त्याद्वारे त्यांना तिन्ही समाजांच्या गुणवत्तेतील फरक मांडायचा आहे. अयोध्या नगरी, तेथील समाज, राजाची मंत्रिपरिषद व त्या मंत्र्यांचे गुण ह्या साऱ्यांविषयीं तीन सर्गांत ७५ श्लोकांचे वर्णन आहे. लंकेच्या मंत्रिपरिषदेचा व मंत्र्यांचा गुणवर्णनाचा कोणताही स्वतंत्र सर्ग राहो—साधा उल्लेखही नाही. लंकेचे वर्णन, रावणाच्या अंत:पुराचे वर्णन आठ सर्गांत ३०० श्लोक एवढे विस्तृत आहे. ह्या वर्णनांची तुलना खाली केलेली आहे. राजधानी व समाजांच्या तुलनेचा हा विचार नवा असला, तरी सार्थक आहे.

* * *

रामायणाच्या बालकांडाच्या दुसऱ्या सर्गात ब्रह्मा वाल्मीकींना असे सांगतो की, 'श्रीराम-सीता-राक्षस ह्या साऱ्यांना प्रकट आणि रहस्यमय/गूढ अशी व्यक्तित्वे आहेत, ती पूर्णपणे वर्णन करा.' श्रीरामांच्या चरित्राचे पूर्ण ज्ञान व्हावे म्हणून वाल्मीकींनी योग-धर्माचा, म्हणजे समाधिमार्गाचा अवलंब केला. त्याद्वारे श्रीरामचरित्रातील सर्व पात्रांचे सारे बारीक-सारीक व्यवहार-संवाद-हास्यविनोद त्यांना समाधी अवस्थेत साक्षात् आकळले. (बालकांड, सर्ग ३.) ते त्यांनी काही अंशीं उघडपणे व काही अंशीं प्रतीकात्मतेने वर्णन केले.

श्रीराम-सीता, वानर, असुर, ऋषिमुनी ह्यांची व्यक्तित्वे वाल्मीकींच्या वर्णनांनुसार आपण समजून घेतली. ह्याचाच जोडीला वाल्मीकींनी मांडलेले अन्य मुद्दे, रचलेले छोटे-छोटे प्रसंग, योजलेले शब्द, योजलेली व्यक्तिनामें इत्यादिही समजून घेणे आवश्यक आहे. समजून घेण्यायोग्य, प्रतीकात्म बाबींची संख्या मोठी आहे : त्यातील काही निवडक गोष्टींचाच आपण उलगडा करणार आहोत, जेणेकरून रामायणाचा आशय अधिकाधिक प्रमाणात स्पष्ट व्हावा.

आपण वानरांचे व्यक्तित्व समजून घेतले. त्यांचा सारा व्यवहार, आहार, निवास, जीवनशैली, सामाजिक स्थिती 'प्राकृत' म्हणजे नैसर्गिक होती नि तरीही ते मनुष्ययोनीतील होते, हे आपण पाहिले. ते सारे 'वानर' होते ह्या वर्णनाचे मूळ वा प्रारंभबिंदू बालकांडाच्या १७व्या सर्गात आहे. ह्या सर्गात देवसभा भरल्याचे वर्णन आहे. ह्या देवसभेत ब्रह्मा भगवान विष्णूला दशरथाच्या तीन राण्यांच्या पोटी चार अंशांत (राम-लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न) जन्म घेण्यास सांगतात, असा उल्लेख आहे. श्रीरामांच्या साह्याकरिता सर्व देवांनीही जन्म घ्यावा असे सांगताना मात्र ब्रह्म्याने वानरी, अस्वली, किन्नरी, इ. मनुष्येतर योनींतील स्त्रियांच्या पोटीं जन्म घेण्यास सांगितले.

| अयोध्या | लंका | किष्किंधा |
|---|---|---|
| ❑ सारे मंत्री आदर्शवत्; नीतिमान; पुत्रासही दंड देतील इतके न्यायी; राजाचे हितैषी; काम-क्रोध-असत्यापासून दूर. | ❑ न्याय-नीती-धर्माचे कोणासही ज्ञान नव्हते. सचिवांनी सीतेचे हरण करण्यास परवानगी दिली. एकाने तर बलात्काराचा सल्ला दिला. 'पशुबुद्धी, लोभी मंत्री' असे कुंभकर्ण वर्णन करतो. | ❑ हनुमंत, जांबुवंत हे नीतिज्ञ, नीतिमान होते. हितैषी होते. त्यांच्यावर राज्याचा भार सोपवून सुग्रीव निश्चिंत झाला, असे वर्णन आहे. |
| ❑ राज्याच्या वैभवाची संयत वर्णने. आवश्यक ते सारे, आवश्यक त्या प्रमाणात. कशाचीही उणीव नाही. राजप्रासादाच्या बाबतीतही अति श्रीमंती वर्णने नाहीत. | ❑ प्रासाद, रथ, पुष्पक विमान, तटबंदी, झाडांचे पार, इ. सारे सोने, रत्ने, मोती, स्फटिक, इ.ने मढवलेले. श्रीमंतीचे बटबटीत वर्णन. विलासप्रियता व बडेजावी दर्शविली आहे. | ❑ वैभवाचे वर्णन त्रोटक. दिव्य पुष्प-फळांचे वृक्ष, विमल नद्या, वने, शोभिवंत फुलांनी डवरलेली वने, इ. सृष्टिवैभवाचे वर्णन अधिक. |
| ❑ समाज प्रसन्न, धर्मात्मा, निर्लोभी, दानी, परधन-परदरा ह्यांची इच्छा न धरणारा. संतुष्ट, निर्मल, बहुश्रुत, संयमी, जितेंद्रिय. आदर्शवत्. | ❑ समाज उत्सवप्रिय, क्रीडारत, मत्त, प्रमत्त, जादूटोणा-अघोरी विद्या ह्यांत पटू; लोभी, भोगप्रवण, अतिरेकी, हिंसक, विलासप्रिय. | ❑ प्रामाणिक, निरागस; प्रेरणा, व्यवहार व जीवनशैली नैसर्गिक; तीव्र भय-भाव; शक्ती, क्षमता व सामर्थ्य नैसर्गिक; भटकी प्रवृत्ती; कळपांनी राहणे. |
| ❑ राजा संयमी, धर्मप्रिय, सत्यप्रिय, प्रजेचे हित सांभाळणारा. | ❑ राजा दुराचारी, पापी, लोभी. तो लंकेच्या नाशास कारण ठरला. | ❑ सुग्रीव व वानरवीर हे परस्परांविषयी सुहृद्भाव बाळगणारे, शांत होते. |

विष्णू जर दशरथाच्या राण्यांच्या पोटीं जन्म घेणार आहे, तर अन्य देवांनी दशरथाचे पुण्यशील, नीतिमान मंत्री, अयोध्यानिवासी समाज ह्यांच्या पोटीं जन्म न घेता पशुयोनीत जन्म घ्यावा ही योजना का आहे? श्रीरामांचे सहाय्यक वानर-अस्वल-गिधाड का? —वाल्मीकींना मनुष्याच्या कार्य-प्रेरणेच्या तीन श्रेणी मांडणे अपेक्षित आहे. पहिली श्रेणी निव्वळ निसर्ग-प्रेरणा : natural instinct; निसर्ग-प्रेरणेपोटी झालेला 'प्राकृत' व्यवहार. वानर हे ह्या श्रेणीचे प्रतिनिधी. रामायणकारांना दुसरी श्रेणी अपेक्षित आहे ती अशी की, निसर्ग-प्रेरणेला सुखाकांक्षेची जोड आहे; परंतु संयमाची मर्यादा आहे. अयोध्येचा नीतिमान समाज हा ह्या मर्यादशील सुखाकांक्षेच्या श्रेणीचा प्रतिनिधी आहे. वानर 'प्रकृती' प्रकट करतात; तर, अयोध्यानिवासी 'संस्कृती' प्रकट करतात. काम-क्रोधावर, सुखाकांक्षेवर विजय मिळवून शांत-विरक्त झालेले ऋषी-मुनी हे 'संस्कृती'च्या प्रकर्षाने निर्माण केलेली उन्नत व्यक्तित्वे प्रकट करतात. असुर मात्र निसर्ग-प्रेरणेला अमर्याद सुखाकांक्षेची जोड देऊन समाज व निसर्गाचे शोषण व विनाश करणारी 'विकृती' प्रकट करतात. श्रीरामकथा ही प्रकृती, संस्कृती व विकृती ह्यांअंतर्गत लीला (interplay) आहे. संस्कृती आणि विकृतींचा संघर्ष सनातन आहे. श्रीरामकथेचे वैशिष्ट्य असे की, 'संस्कृती'चे प्रतिनिधी असणाऱ्या श्रीरामांनी 'प्रकृती'चा, म्हणजेच सुग्रीवाचा, आश्रय घेतला आणि 'विकृती' निपटून काढली. लक्ष्मणाने 'सुग्रीवाचा कृपाप्रसाद श्रीरामांना प्राप्त व्हावा' (किष्किंधाकांड, सर्ग ४) म्हटले, ह्यातून हा आश्रय आढळतो. श्रीरामांनी सीतेच्या सुटकेसाठी अयोध्येतून चतुरंग सेना न बोलावता वानरसेना बरोबर घेतली, ही योजना ह्या कारणाने!

श्रीरामकथेतील सीता-अपहरणाचा प्रसंगही विशेष बोध देणारा आहे. त्या प्रसंगीं त्यात सामील साऱ्या व्यक्ती आपल्या स्वाभाविक भूमिकेपासून ढळल्या आहेत. सीतेचे अपहरण करण्याची कल्पना मारीचास मान्य नव्हती. श्रीरामांचे माहात्म्य व पराक्रम तो जाणून होता. अरण्यकांडाच्या ३१व्या सर्गानुसार मारीचाने रावणाला त्यापासून परावृत्त केले व रावण लंकेस परतला. काही काळानंतर रावण पुन: आला व त्याने मारीचास धमकावून साहाय्यक बनविले. (सर्ग क्र. ३९, ४०.) मारीच आपल्या भूमिकेस ढळला. रावणही त्याच्या स्वाभा-विकतेपासून खाली घसरला होता : रावण जसा महापराक्रमी होता, तसाच घमेंडी होता. ह्या घमेंडीपोटी तो जगभर सर्वांना आव्हान देत दिग्विजय करीत हिंडला. परंतु, सीतेचे अपहरण त्याने श्रीरामांना आव्हान देऊन, त्यांचा पराभव करून केले नाही : भ्याड कारस्थान रचून, सीतेला एकटी पाडून, भिक्षुकाचे सोंग घेऊन केले. श्रीराम-सीता हे ऋषितुल्य, निरपेक्ष जीवन जगण्याचा निर्णय करून वनवासी होते. अयोध्याकांडातील वर्णनाप्रमाणे झाडांवरून गळून पडलेली फळे आहार म्हणून स्वीकारणे, गळून पडलेल्या पानांची शय्या करणे इतके निसर्गस्नेही राहण्याचा त्यांचा निर्णय असताना, ते 'कांचनमृगा'च्या मोहात पडले. सीतेने तो मृग मागितला, आणि 'तो मायावी असुर आहे' असे लक्ष्मणाने सांगितल्यावरही पत्नीच्या इच्छापूर्तीसाठी श्रीराम मृगयेस गेले. 'ऋषी-मुनींच्या रक्षणासाठी शस्त्रे आहेत' असे श्रीराम सीतेस म्हणाले होते. येथे मात्र 'मायावी असुर मारला जाईल व कांचनमृग प्राप्त होईल' असा युक्तिवाद श्रीरामांनी केला. अर्थात् श्रीराम-सीता आपल्या स्वाभाविक भूमिकेपासून ढळले. लक्ष्मणावर घेतलेला अभद्र आळ हा सीतेचा दुसरा प्रमाद; तर, श्रीरामांच्या पराक्रमाची खात्री असूनही लक्ष्मणाने श्रीरामांच्या आदेशाचे उल्लंघन करून सीतेस आश्रमात एकटी सोडून प्रयाण केले हा लक्ष्मणाचा प्रमाद! 'काम'भावाचा मनात प्रवेश झाल्यावर भले-भलेही आपल्या स्वाभाविक माहात्म्यापासून कसे ढळतात, हेच ह्यावरून दिसून येते. ☯

*(क्रमशः)*

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय

९

*उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण ह्या धोरणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. आता दोन दशकांनंतर कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी लिहिलेल्या ग्रंथातील निवडक माहिती संकलित करून 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

विभाग ३

**पर्यायांकडे : मूलभूत पर्यावरणस्नेही लोकशाही**

**प्रस्तावना**

मानव समाजाचं खरं ध्येय जर आनंद, स्वातंत्र्य आणि समृद्धी हे असेल, तर पर्यावरणाची किंवा स्वत:ची हानी न करता; किंवा, आपल्यापैकी निम्म्याअधिक जणांना मागे न ठेवताही ते साध्य करण्याचे अनेक पर्यायी मार्ग आहेत. हे अन्य कोणत्याही देशाप्रमाणे भारतालाही लागू आहे. अर्थात् त्या त्या ठिकाणचं पर्यावरण, संस्कृती, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती ह्यांच्या अनुसार ह्या पर्यायांचे तपशील वेगवेगळे असतील.

मानवी कल्याणाच्या कोणत्याही प्रारूपाला ढोबळपणे 'मूलभूत पर्यावरण-स्नेही लोकशाही' (Radical Ecological Democracy) असं म्हटलं जाऊ शकतं. मानवी समता आणि पर्यावरणाची धारणा ह्या दोन मूलभूत तत्त्वांवर आधारित अशी ही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था असेल. सर्व नागरिकांना तिच्या निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याचा हक्क आणि पूर्ण संधी असेल. पर्यावरणाची धारणा होण्यासाठी साऱ्या पर्यावरण-व्यवस्था टिकण्याची, संतुलितपणे कार्यरत असण्याची गरज असते. जीवनाचा मूलाधार असलेली जैविक विविधता टिकून राहणं ह्याला ह्यात कळीचं महत्त्व असतं. मानवी समतेचे अनेक पैलू आहेत : संधींची समता; विकेंद्रीकरण आणि सहभाग ह्यांतून सर्व स्तरांवरच्या निर्णयप्रक्रियेत प्रवेश असणं; मानवी प्रयत्नांतून जे काही प्राप्त होतं, त्याचे लाभ जात, वर्ग, वय, लिंग, वंश, इत्यादी भेदांशिवाय सर्वांना समन्यायी पद्धतीनं मिळणं, इत्यादि.

ह्यांच्याशी जोडलेली काही मूलभूत तत्त्वं आणि मूल्यं आहेत, ज्यांचा सदैव आदर केला गेला पाहिजे : विविधता आणि बहुविधता (जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या साचेबद्धतेच्या किंवा एकसुरी-करणाच्या विरुद्ध असलेली); सामायिक संसाधनांचं सामूहिक आणि सहकारी पद्धतीनं नियोजन (गळेकापू स्पर्धा वा व्यक्तिवाद नव्हे); सुस्पष्ट मानवाधिकार आणि सर्वांवरचं पार्यावरणिक दायित्व; श्रमप्रतिष्ठा (बौद्धिक कामच तेवढं श्रेष्ठ असं न मानणं); विविध गुणात्मक आणि संख्यात्मक प्रकारांच्या मिश्रणातून आनंदाची प्राप्ती (निव्वळ उपभोगवादाला विरोध); मानवां-मानवांतील परस्परसंबंधांवर भर; वाद सोडवण्याच्या पारंपरिक पद्धतींचा अवलंब; अहिंसा; निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची क्षमता आणि अधिकार जिच्यात प्रत्येकाला आहे अशी सखोल लोकशाही; आणि निसर्गाच्या आणि मानवेतर प्रजातींच्या हक्कांचा आदर.

ह्या सर्व (आणि ह्यात नि:संशय समाविष्ट होऊ शकणाऱ्या अन्यही काही) तत्त्वांचा आणि मूल्यांचा एकत्रित विचार करता असं म्हणता येईल की, मूलभूत पर्यावरणस्नेही लोकशाही हा परस्परांचा आदर करणारा, मानवा-मानवांमधला आणि मानव-निसर्गामधला सातत्यपूर्ण संवाद आहे. ते 'एकमेव उत्तर वा आराखडा' नाही; तर, विविध उत्तरांचा आणि आराखड्यांचा तो संच आहे. एके काळीं ज्या व्यवस्था मूल्यवान मानल्या जायच्या—ज्यांना आज कालबाह्य वा आदिम मानलं जातं—त्यांचा ह्या आराखड्यात पुन्हा समावेश होईल : मूलभूत गरजांचीच पूर्तता करणारी अर्थव्यवस्था; वस्तुविनिमय; आठवडे बाजार; मौखिक ज्ञान-परंपरा; काम-मोकळा वेळ ह्यांचं संतुलन साधणारी जीवनशैली; माणसाचे श्रम हलके करणारं—त्याच्या स्वार न होणारं—तंत्रज्ञान; स्थानिक स्वास्थ्य-परंपरा; हस्तकला; पालक वा ज्येष्ठ व्यक्ती ह्यांच्याकडून कृति-आधारित शिक्षण; उपभोगांचा निर्लज्ज अतिरेक आणि अपव्यय ह्यांपासून दूर राहणं, इत्यादि. पण, ह्याचा अर्थ असाही नव्हे की, सर्व परंपरांचा डोळे झाकून स्वीकार करायचा : भारतीय परंपरांमधल्या कित्येक परंपरा अशा आहेत की, ज्या आता सोडून द्यायलाच हव्यात. योग्य परंपरांचा विवेकपूर्ण स्वीकार आणि विस्मृतीत गेलेल्या उपयुक्त प्रथा-परंपरांचं पुनरुज्जीवन ह्यांतून जे काही उत्तम हातीं लागेल त्यावर भविष्याची उभारणी करायची. हा उजवे हिंदुत्ववादी म्हणतात त्या प्रकाराचा अहंकारी पुन-रुज्जीवनवाद नाही : किंबहुना, अशा हेतूंनी उपयोग करणाऱ्यांपासून परंपरांचा बचावच करायला हवा. ☯

*(क्रमशः)*

**मासिकाच्या मालकीबाबत निवेदन** अर्ज क्रमांक ४ (नियम ८ प्रमाणे)

*प्रकाशनाचे स्थान* : १, 'मेघदूत', स्नेहनगर, पुणे ४११ ०३०.

*प्रकाशनाची आवधिकता* : मासिक (प्रत्येक सौर महिन्याचा १ला दिनांक.)

*मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक* : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

*राष्ट्रीयत्व* : भारतीय. *पत्ता* : कुडावळे ४१५७१२, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

मी, दिलीप दत्तात्रय कुलकर्णी असे घोषित करतो की, वरील विवरण माझ्या अधिकतम माहिती व समजुतीनुसार सत्य आहे.

*पुणे, सौर १ चैत्र, शके १९३७* *प्रकाशक*

*ब्रिटनमधल्या ‘गार्डियन’ ह्या वृत्तपत्रानं निवडलेल्या पर्यावरण-रक्षकांचा परिचय*

# पर्यावरणाचे भाग्यविधाते ३

**संतोष शिंत्रे**

### ९. (कॅप्टन) पॉल वॅटसन

शार्क, व्हेल आणि अन्य सागरी वन्यजीवांना पॉल वॅटसन हा देवदूतासमान आहे; तर, त्यांच्या तस्करांसाठी तो एक धडकी भरवणारा ‘इको टेररिस्ट’ आहे. ‘seashephard.org’ ह्या त्याच्या विना नफा संघटनेची जहाजे जगभरातल्या समुद्रांमध्ये गस्त घालत असतात. समुद्री जीवनाचे तस्कर आणि त्यांची जहाजे ह्यांना ती थेट धडक देऊन जलसमाधी देऊन संपवतात. आजवर कैक लाख सागरी जीव पॉलच्या कृती-कार्यक्रमामुळे वाचलेत. १९७०मध्ये स्थापन झालेल्या ‘ग्रीनपीस’ ह्या पर्यावरण समूहाचा पॉल हा सहसंस्थापक; पण, पुढे संघटनेची उद्दिष्टे ‘मवाळ’ झाली असे वाटल्याने तो बाहेर पडला, आणि त्याने ‘सी शेफर्ड’ काढली. २००७मध्ये, उत्क्रांतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या गॅला-पगास बेटांच्या सुरक्षेची जबाबदारी इक्वेडोर सरकारने त्याच्यावर टाकली. त्यानंतरच्या एकाच महिन्यात ९२,००० समुद्री काकड्या आणि १९,००० शार्कांचे कल्ले त्याने जप्त करून दाखवले. सुमारे ३५ मैल परिसरातल्या अवैध सागरी उचापती संपूर्ण थांबवून दाखवल्या. त्याची जीवनगाथा वाचताना हे लक्षात येते की, (अगदी फेब्रुवारी २०१५ पर्यंत) एकही दिवस शब्दश: वाया न घालवता पॉलने सागरी पर्यावरण राखण्याचे काम इमाने इतबारे गेली चाळीस-पन्नास वर्षे केले आहे.

### १०. कार्लो पेट्रिनी

‘मॅकडोनल्ड’ या झटपट-अन्न-साखळीचा कट्टर विरोधक असूनही डेविड कॅमेरून, प्रिन्स चार्ल्स, अल् गोर आणि ओबामा ह्यांच्या कार्यालयांमध्ये केव्हाही स्वागत असणारा एकमेव मनुष्य म्हणजे कार्लो. ‘फास्ट फूड’च्या विरोधात त्याने ‘स्लो फूड’ चळवळ सुरू केली. जैववैविध्य आणि आपण खातो ते अन्न ह्यांचा निकटचा संबंध आहे, हे ह्या चळवळीचे म्हणणे. ‘www.slowfoodfoundation.com’ ह्या संकेतस्थळावर ते सविस्तर मांडलेले आहे. छोट्या प्रमाणात, फक्त स्थानिक पातळीवर आणि जास्तीची वाहतूक टाळूनचअन्नसेवन—आणि तेही चविष्ट—कसे करता येईल, ह्यावर ‘स्लो फूड’-चळवळीचा भर आहे. दीडशेहून अधिक देशांमध्ये आता ही चळवळ पसरली आहे. जगभर एकच एक चव असणाऱ्या, ‘सपाटीकरण’ झालेल्या ‘मॅक्डोनल्ड’-सदृश अन्नसंस्कृतीला त्यांचा विरोध आहे.

### ११. डॉ. टेवोल्ड एग्झियामेर

काहीसे गुंतागुंतीचे आडनाव असणारा हा कृषिपंडित म्हणजे इथिओपियाचा ‘कार्व्हर’च आहे. २००२च्या वसुंधरा परिषदेत डॉ. टेवोल्ड ह्यांनी केलेल्या प्रभावी, मुद्देसूद आणि घणाघाती व्याख्यानामुळे सर्वच गरीब आणि विकसनशील देशांचे सर्व पार्यावरणिक आणि जैववैविध्याच्या मालकीचे अधिकार त्यांच्या मालकीचे राहिले आहेत. त्यांच्या भाषणाआधी ‘जागतिक व्यापार संघटनेचे अधिकार हे आंतरराष्ट्रीय पर्यावरण-करारांना उल्लंघून प्राथमिकतेचे (prioritized) ठरतील’ अशा अमेरिकेच्या प्रस्तावाला सर्व उपस्थित राजकारणी ‘होयबा’ सारखा सर्वंकष पाठिंबा देणार, हे जवळजवळ निश्चित झाले होते. पण डॉ. टेवोल्डच्या भाषणाने बऱ्याच जणांचे मतपरिवर्तन होऊन तो प्रस्ताव फेटाळला गेला. एखाद्या राष्ट्राचे जैविक मूलस्त्रोत हे इतरेजनांना नियंत्रित प्रमाणातच उपलब्ध असणे (controlled access); स्थानिकांच्या समूहांचे अधिकार जपणे अशा प्रकारचे मूलभूत हक्करक्षण होण्यामध्ये डॉ. टेवोल्ड ह्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. जैववैविध्यविषयक आंतरराष्ट्रीय करार अस्तित्वात येण्यात, वनस्पतिशास्त्रज्ञ असणाऱ्या डॉ. टेवोल्ड ह्यांचा अगदी पहिल्या टप्प्यापासून (१९९२) ते अंतिम टप्प्यापर्यंत (२०००) महत्त्वाचा सहभाग राहिलेला आहे. जैव-सुरक्षा-कराराच्या वाटाघाटींमधल्या त्यांच्या भरीव कामगिरीमुळे २००० सालचा Right Livelihood पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. त्यांनी त्यांची मातृभूमी असलेल्या इथिओपियासाठी अत्यंत महत्त्वाच्या अनेक पर्यावरणीय गोष्टी केल्याचे आढळते. ☯

*(क्रमश:)*

---

*स्वप्रयत्नांनी स्वास्थ्यप्राप्ती*

## स्वास्थ्यपंचक ४

# नैतिकता

**ललिता रामचंद्र**

स्वास्थ्य आणि नैतिकता ह्यांच्यात दृढ मैत्रीचे नाते आहे. दोघे एकमेकांना सोडून राहत नाहीत. नैतिकता तिथे स्वास्थ्य आणि स्वास्थ्य तिथे नैतिकता. नैतिकता म्हणजे मूल्याधिष्ठित आचरण. अहिंसा, सत्य, अस्तेय, सद्भाव, प्रामाणिकपणा, इ. शाश्वत मूल्यांचा आदर करणारी माणसे ही त्या मूल्यांचा अनादर करणाऱ्या माणसांपेक्षा निश्चितच अधिक स्वस्थ असतात. त्यांच्या जीवनात विवेकाला, विचाराला स्थान असते. त्यांचे आचरण सभ्यतेचे असते. विचारी माणूस दुराचार, भ्रष्टाचार ह्यांपासून दूर राहतो. तो सदाचाराचा आणि सदाचारी लोकांचा आदर करतो; दुराचारी, भ्रष्टाचारी लोकांची उपेक्षा करतो. त्यामुळे त्याच्या जीवनात एका प्रकारची शांती व समाधान भरून राहते व तो स्वस्थ राहतो. नीतिमान माणूस कोणालाही अकारण दुखवत नाही. संस्कृतीची मूल्ये त्याच्या जीवनात अभिव्यक्त होतात. त्यामुळे त्याचे सर्वांशी चांगले संबंध राहतात. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हे त्याला चांगले कळते व वळतेही. एकत्र राहणे; एकमेकांच्या सुखदु:खांशी समरस होणे; सर्वांनी मिळून उपभोग घेणे हा संस्कृतीचा भाग आहे. ह्यात सर्वांचा विचार आहे. स्वार्थाचा त्याग आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात की, स्वार्थपरता ही अनीती व नि:स्वार्थपरता हीच नीती. म्हणून नैतिकता जपायची असेल, तर नि:स्वार्थ व्हायला हवे. नैतिकता जपली की, स्वास्थ्यही जपले जाईल. जीवनात स्वार्थ आला तर कलहही येतात. कलह हे मन:स्वास्थ्य आणि शरीरस्वास्थ्यही हिरावून नेतात. जसजसा माणूस स्वार्थी होऊ लागलाय, स्वत:पुरतेच पाहू लागलाय, तसतसा तो मनोशारीरिक व्याधींना बळी पडत चाललाय. आपण आपल्या मनावरील नैतिकतेची पकड सैल केली की, शरीरावर व्याधींची पकड घट्ट होते हे जाणून असायला हवे.

व्यवसाय म्हणजे ‘आय’-संवर्धनासाठी केलेला व्यवहार. ‘संवर्धन’ म्हणजे सम्यक्, सुयोग वर्धन. पैसा, संपत्ती, ऐश्वर्य योग्य प्रमाणात वाढवले, तर त्यांचा उपभोग घेऊन आनंद मिळवता येतो व त्यामुळे स्वास्थ्यलाभही होतो. पण, आजकाल सर्वच क्षेत्रांत व्यवसाय म्हणजे नैतिकतेचा व्यय असे चित्र दिसू लागले आहे. पैसा भरपूर मिळतोय; पण, तो टिकत मात्र नाहीये. अधिक प्रमाणात मिळाल्याने त्याला अनावश्यक, अयोग्य वाटाही फुटत आहेत. बँक-बॅलन्स सोबत सर्व बिलेही वाढत आहेत. औषधोपचारांच्या बिलांमध्ये लक्षणीय वाढ होतेय. तसेच, पैशाच्या संरक्षणाचीही काळजी निर्माण होतेय. नैतिकता सोडून पैसा मिळवणाऱ्यांच्या मनाला तर तीही एक अधिक बोच लागतेय. शिवाय, ‘गैरव्यवहार पकडला गेला तर...’, ह्या विचाराची टांगती तलवार सतत असतेच. मग स्वास्थ्य कसे टिकणार? नैतिकता आपण स्वेच्छेने सोडतोय आणि स्वास्थ्य आपल्याला आपल्या इच्छेविरुद्ध सोडून जातेय. कारण दोघांची मैत्री अतूट आहे. हे आम्हाला केव्हा समजणार? जितके लवकर समजेल तितके बरे.

विचार, व्यवहार आणि व्यवसाय ह्यांत नैतिकता निश्चयपूर्वक टिकवून ठेवणे हा स्वास्थ्य-समस्या संपविण्याचा प्रभावी मार्ग आहे. म्हणून ‘नैतिकतेचे पालन म्हणजेच स्वास्थ्याचे संवर्धन’ हे घोषवाक्य घराघरातच नव्हे; तर, मनामनात पोहोचवू या आणि संपूर्ण समाज स्वस्थ करू या. ☯

*(क्रमश:)*

---

*‘स्वच्छ भारत अभियाना’च्या निमित्तानं लेखमाला*

## विकास, स्वच्छता आणि पर्यावरण ३

# अन्न हवं की, वीज?

**दिलीप कुलकर्णी**

*उद्याच्या अन्नापासून आज वीज तयार करून आपण घोडचूक करत आहोत, अन् ह्या प्रक्रियेला म्हणतो आहोत ‘स्वच्छता’!*

शहरं नावाच्या केंद्रीकृत व्यवस्थेत सेंद्रिय कचऱ्याचं विघटन होऊच शकत नाही, हे आपण पाहिलं. इतक्या प्रचंड प्रमाणातल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमताच निसर्गात नसते.

पण, गोळा होणाऱ्या कचऱ्याचं काही तरी करायलाच हवं. तो कचरा हा कुंड्यांत वा रस्त्यावर कुजत राहिला, तर सर्वदूर घाण वास पसरेल. त्याच्या कुजण्यामुळे रोगराई पसरेल. म्हणून मग केंद्रीकरणाच्या चुकीवर आपण दुसरी चूक करून उत्तर शोधतो : कचरा जाळणं!

सेंद्रिय द्रव्यं म्हणजे कर्बाचीच संयुगं. पेटवल्यावर ती जळणारच. ती पाला-पाचोळ्यासारखी कोरडी असतील तर पट्कन जळतील; ओली असतील तर दीर्घकाळ धुमसतील. दोन्ही वेळी त्या कर्बाचं रूपांतर होईल कार्बन-डाय-ऑक्साईड वायूत. म्हणजे, आधीच अन्य प्रकारांनी अतिप्रचंड प्रमाणावर आपण हवेत कर्बवायू सोडतो आहोतच; त्यात ह्या कचरा जाळण्याची भर. पर्यायानं, जागतिक तापमानवाढीत भर. सेंद्रिय कर्बाचं रूपांतर हवेतल्या कर्बात करून आपण समस्या वाढवतो, अन् तरीही त्याला म्हणतो ‘स्वच्छता’! स्वच्छता म्हणजे प्रदूषणात वाढ!

ओला कचरा ह्या प्रकारे सर्रास जाळला जात नसेलही; पण, पालापाचोळा मात्र निश्चितपणे जाळलाच जातो. ‘पालापाचोळा हा कचरा आहे’ हा भ्रम आधुनिक जीवनशैलीवाल्यांनी निर्माण केलेला आहे; अन् ते उच्चभ्रू त्याला ‘कचरा’ म्हणत असल्यानं सर्वजणच त्याला कचरा समजतात. नाही, नाही, नाही : पालापाचोळा हा कचरा नाही! ते जमिनीतल्या सूक्ष्मजीवांचं अन्न आहे; वनस्पतींचं अन्न आहे. ओली-कोरडी अशी सारी सेंद्रिय द्रव्यं हे सूक्ष्मजीवांचं अन्न आहे. त्या द्रव्यांमध्येही काही प्रमाणात ऊर्जा शिल्लक असते (—मूळ संश्लेषणा-च्या वेळी वनस्पतीत बंदिस्त झालेली.) पालापाचोळ्यासारखी द्रव्यं कोरडी असताना त्यांवर सूक्ष्मजीव निर्माण होऊ शकत नाहीत; पण, पाऊस पडून ती ओली होताच सूक्ष्मजीवांना पोषक वातावरण तयार होतं, नि ते लगेच त्यांच्या विघटनाच्या कामाला लागतात. ते रेणूंचं विघटन करून त्यातून जगण्यासाठीची ऊर्जा मिळवतात, नि असं जगताना निसर्गचक्राला गती देतात : विघटित झालेली मूलद्रव्यं संश्लेषणासाठी पुन्हा जमिनीत तयार ठेवून. जमिनीतला सेंद्रिय कर्ब वाढवून. वनस्पती पुन्हा त्याच अणूंचं संश्लेषण करून अन्न-निर्मिती करतात. हे चक्र असंच फिरत राहतं.

आपण जेव्हा कचरा जाळतो, तेव्हा हे चक्र खंडित होतं. सूक्ष्मजीवांसाठी सेंद्रिय कर्बच उरत नाही. समजा जमिनीत मूलद्रव्यं असली, तरी ती ज्या सेंद्रिय कर्बाशी जोडली जायला हवीत, तो सेंद्रिय कर्बच उपलब्ध नसल्यानं वनस्पतींची वाढच होत नाही. त्या खुरटतात. जमिनीचा कस उणावत जातो. सेंद्रिय द्रव्यं ही मातीच्या असेंद्रिय कणांना एकत्र बांधून ठेवण्याचं काम करत असतात. त्यांच्या अभावी मातीचा चिकटपणा कमी होऊन हे कण सुटे सुटे होतात, नि वाऱ्या-पावसानं धुपले जातात. जमिनीचं क्षरण वाढतं.

ही प्रक्रिया जशी शहरांतल्या जमिनींमध्ये होते, तशीच तिकडे ती शेतजमिनींमध्येही होते. फळं, पाला, शेंगा, धान्यं हे अन्न काढून घेतल्यावर भाज्यांचे देठ, शेंगांची टरफलं, फळांची सालं, कडबा ही सारी द्रव्यं पुन्हा त्याच शेतात परत जायला हवीत. माणसांनी हे अन्न खाल्ल्यावर तयार होणारा मलही पुन्हा शेतातच जायला हवा. कडबा हे गुरांचं अन्न आहे असं म्हटलं, तर तो खाऊन तयार होणारं शेण शेतातच जायला हवं. ही सारी अवशिष्ट द्रव्यं हे सूक्ष्मजीवांचं अन्न आहे. आपण आज त्यांना अन्न दिलं, तरच निसर्गचक्र चालत राहून उद्या आपल्याला अन्न मिळणार आहे.

पण, गेल्या वेळीं पहिल्याप्रमाणे, शहरीकरण नावाच्या केंद्रीकरणकारी व्यवस्थेत अन्नाचं हे चक्र पुरंच होऊ शकत नाही. शहरांत जमीन अशी उरलेलीच नाही, नि जिथे ती आहे तिथे पालापाचोळा पडलेला आपल्याला सहन होत नाही. त्यामुळे आपण तो जाळून टाकतो. जो ओला कचरा घरोघर निर्माण होतो, तो पुन्हा शेतात नेऊन टाकणं हे आर्थिक आणि और्जिक दृष्ट्या शक्य नसल्यानं आपण तो गोळा करून डंपिंग ग्राऊंडवर नेऊन नुसताच ओततो.

बरीच वर्षं हे असंच चालू राहिल्यानंतर काहींच्या डोक्यात ‘ग्रीन एनर्जी’ची कल्पना आली : आपण म्हणे ह्या कचऱ्यापासून वीज तयार करू या! एक तर तो थेट जाळून, किंवा त्यापासून जैव-वायू बनवून तो जाळून ही वीज तयार केली जाते. वरवर पाहता ही चांगली गोष्ट वाटते. काही प्रमाणात ती चांगली आहेही. पालापाचोळा, ओला कचरा नुसताच जाळण्यापेक्षा त्या ज्वलनाच्या उष्णतेपासून वीज बनवणं केव्हाही चांगलंच. निदान काही ऊर्जा तरी आपण परत मिळवली, असं म्हणता येईल.

पण, ह्यातून दोन प्रश्न पुढे येतात : ह्या विजेचं आपण काय करतो हा एक; नि जमिनीत सेंद्रिय कर्बाचं पुनर्भरण कसं होणार हा दुसरा. कचऱ्यापासून वीजनिर्मिती होते; पण, ती वीज पुन्हा शहरात निसर्गाची हानी करणाऱ्या कामांसाठीच वापरली जात नाही का? ती रस्त्यांवर रात्रभर अंधाराला उजेड दाखवण्यासाठी वापरली जाते; किंवा हीटर-गीझरनं पाणी तापवण्यासाठी वापरली जाते; उपभोगवाद वाढवणाऱ्या टीव्हीसाठी वापरली जाते; एकूणातली उष्णता वाढवणाऱ्या कूलर-एसींसाठी वापरली जाते, वगैरे वगैरे. आम्हाला हे सर्व आवश्यक वाटतं : अन्ननिर्मिती नाही! आपल्याला काय हवं : आज वीज; की, उद्या अन्न? (ह्याचं उत्तर ‘आज वीज’ देणारेही अनेक जण असतील!)

विजेविषयी आपल्या मनात एक पूज्य भाव असतो. एखाद्या देवभक्ताला देवाच्या दर्शनानं जसं छान वाटतं; तसंच, कशापासूनही ‘वीज’ तयार केली की, आपल्याला छान वाटतं! आपण काही तरी महान लोकोपयोगी कार्य केलं आहे अशी उदात्त भावना आपल्या मनात निर्माण होते. अन् घाण स्वच्छ होऊन त्या कचऱ्यापासून जर वीज बनत असेल, तर ‘नथिंग लाईक इट!’

—आपण निसर्गरचनेपासून किती दूर गेलो आहोत, ह्याचंच हे निर्देशक आहे. तो जो काही कचरा आहे, ती ‘घाण’ नाही; ते सूक्ष्मजीवांचं, जमिनीचं आजचं अन्न आहे; ते माणसाचंच उद्याचं अन्न आहे हे आम्ही पार विसरून गेलो आहोत. ते अन्नचक्र पुरं न करू शकणारी व्यवस्था निर्माण करून आपण एक घोडचूक केली आहे, नि ती दुरुस्त करण्यासाठी त्या उद्याच्या अन्नापासून आपण आज वीज तयार करून दुसरी घोडचूक करत आहोत. अन् ह्या प्रक्रियेला म्हणतो आहोत ‘स्वच्छता’!

—स्वच्छता करायचीच असेल, तर पालापाचोळा झाडांखाली कुजवूनच ती करावी लागेल. काडीकचरा शेतांत परत टाकूनच करावी लागेल. सेंद्रिय कर्ब जमिनीत जिरवूनच जंगलं, निसर्ग स्वच्छ होत असतो : तो जाळून नव्हे; वा त्यापासून वीज बनवून नव्हे.

‘आज हे कसं शक्य आहे’ असं म्हणायचं असेल, तर मग निदान ‘आम्ही स्वच्छता करतो आहोत’ असं तरी म्हणू या नको. स्वत:चीच फसवणूक करू या नको. ☯

*(क्रमश:)*

**वर्गणी मनिऑर्डरने पाठवताना...**

❏ प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाची ३०रु.ची स्वतंत्र म.ऑ. करावी.

❏ जुन्या वर्गणीदारांनी नावानंतर कंसात आपला पावती क्रमांक लिहावा.

**ई-ग.सं.हवाय?—ई-पत्ता कळवा.**

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

## हिरवं वाचन

### अजित बर्जे

**‘भू**संपादन’ हा विषय सध्या गाजतो आहे. ह्याच्याइतकाच महत्त्वाचा व लाखो आदिवासींच्या उपजीविकेवर दूरगामी परिणाम करणारा दुसरा मुद्दा आहे तो वनहक्काचा. आदिवासी व स्थानिक लोक आपल्या गरजा व उपजीविकेसाठी परिसरातील जंगलांवर शतकानुशतके विसंबून होते. ते वनांचे रक्षण व संवर्धनही करायचे. त्याविरुद्ध कायदे करून ब्रिटिश राजवटीने निर्बंध घातले. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यावरही ६० वर्षे ते तसेच चालू राहिले. पुढे २००६ साली जरी वनहक्क कायद्याद्वारे देशातील ग्रामसभांना वनाधिकार दिले गेले, तरी प्रत्यक्षात सरकारी मनोवृत्ती वसाहतवादी खाक्याचीच आहे.

आजही निम्याहून अधिक लोकसंख्या शहर-परिघाच्या बऱ्याच दूर वसलेली आहे. वरील दोन्ही परिस्थितींचा एकत्रित परिणाम होऊन ही जनता देशोधडीला लागली, तर शतकभरापूर्वी जो झंझावात मेक्सिको देशात आला, त्याची पुनरावृत्ती आपल्याकडे होऊ शकते. *डाऊन टु अर्थ* पाक्षिकाच्या जानेवारीच्या दुसऱ्या अंकात, ह्या समस्येचे निराकरण त्या देशातील सरकारने कसे केले ह्याबद्दल *‘मेक्सिकन टिंबर ट्रेल’* ह्या मुखपृष्ठ-कथेद्वारे विवेचन केलेले आहे. अंकात प्रसिद्ध झालेल्या ह्या विषयीच्या तीन लेखांचा एकत्रित धांडोळा आपण इथे घेऊ.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या शतकात मेक्सिको देशातील भूमिहीन शेतकरी व वनवासी ह्यांनी सशस्त्र क्रांतीद्वारे तेथील एकसत्ताक राज्यकर्त्याला नमवून दहा कोटी हेक्टर जमिनीचे (त्या देशाचा निम्याहून अधिक भूभाग) हस्तांतरण घडवून आणले. त्यापूर्वी विदेशी उद्योग व त्या देशातील मूठभर धनाढ्य लोकांच्या ताब्यात देशातील ८७% जमीन होती; तर, ९५% लोक भूमिहीन होते. असे हस्तांतरण जरी झाले, तरी संविधानात बदल करून त्यावर अप्रत्यक्ष अधिकार सरकारचाच राहील अशी तरतूद केली गेली व ही परिस्थिती ८०च्या दशकापर्यंत तशीच राहिली. मध्यंतरीच्या काळात ‘नागरिकांच्या भल्यासाठी’ एका धोरणाद्वारे दीर्घ मुदतीच्या भाडेतत्त्वावर खाजगी उद्योगांना जमीन खुली करून दिली गेली, ज्यातून निसर्ग व स्थानिकांचे शोषण होत राहिले. ह्या उद्योगांना त्यांच्या नफ्याचा काही हिस्सा स्थानिकांना देण्याचे बंधन घातले गेले, जे कधीच पाळले गेले नाही. अनेक कायदेशीर लढाया, धरणी व आंदोलनांनंतर सरकारला धोरणे बदलणे भाग पडले, व १९९६नंतर आलेल्या नवीन सरकारने लोकहिताला बाधा आणणाऱ्या कायद्यात सुधारणा करून पुढील चार वर्षात ७०% हून अधिक जमिनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ३५ हजार स्थानिक जमाती व समूहांना बहाल केली.

अधिकारांबरोबरच जबाबदारी व आव्हानेही आली. सरकारी अधिकारीही सहजासहजी हार मानणारे नव्हते. पण, अनुभवातून शिकत-शिकत निश्चयाने लोकांनी अनेक अडचणींवर मात केली. वनांवर आधारित अनेक कुटिर-उद्योगांची उभारणी करून प्रत्येक कुटुंबाला उपजीविकेचे साधन मिळाले. त्यातूनच आता सामायिक निधी उभारून शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते, सार्वजनिक इमारती, खेळासाठी प्रोत्साहन, इ. कामे मार्गी लावली जातात. ह्यामधून वृद्धांना निवृत्तिवेतनही दिले जाते. रोजगारासाठी अमेरिकेत स्थलांतरित होणाऱ्या युवकांचा प्रश्न ह्यामुळे निकाली निघाला. ह्या सर्वांचा काही तपशील व आकडेवारी लेखात दिलेली आहे.

एकीकडे हे सर्व बदल होत असताना केवळ कायदे बदलून उपयोग होणार नव्हता; तर, बदललेल्या परिस्थितीनुरूप सरकारी मानसिकतेत बदल होणेही गरजेचे होते. विशेष म्हणजे पुढे प्रशासनानेही आपली नियंत्रकाची भूमिका सोडून साहाय्यकाची भूमिका घेतल्यामुळे लक्षणीय बदल होऊन, सामायिक प्रयत्नांतून नवा इतिहास रचला गेला. ह्याचा जसा लोकांना फायदा झाला; तसेच, मध्यंतरीच्या काळात खाजगी उद्योगांनी पूर्णत: नष्ट केलेल्या जंगलांचे पुनरुज्जीवन होण्यासही मदत झाली. ह्या संपूर्ण व्यवस्थेत आजही जरी सर्व काही आलबेल नसले, तरी एकूणात सामाजिक, आर्थिक, पार्यावरणिक, तसेच राजकीय दृष्ट्या सर्वानाच ह्याचा फायदा होत आहे.

ह्या पार्श्वभूमीवर जगात सर्वत्र जंगल-व्यवस्थापनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होत आहे, व भारतानेही ह्याचे महत्त्व जाणून त्या दिशेने योग्य पावले वेळीच उचलण्याची गरज लेखात व्यक्त केली गेली आहे. ह्या बाबत मेक्सिको व आपल्या देशात आज तरी दोन ध्रुवांचे अंतर आहे. आपल्या देशात २००६ साली वनहक्क-कायदा जरी अस्तित्वात आला, तरी त्याची अंमलबजावणी नगण्य म्हणावी अशीच आहे. पापुआ न्यू गिनी, बोलीव्हिया ह्यांसारखे मागास देश, ते प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या चीन, ब्राझीलसारख्या देशांतही आपल्या पेक्षा खूप चांगली परिस्थिती असल्याचे ह्यात नमूद केले आहे. केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या अंदाजानुसार लाकडा-व्यतिरिक्त जंगलातील इतर उत्पादनांतून प्रति वर्षी एकूण चार हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते व ह्यातील बहुतेक सरकारी व खाजगी तिजोरीत जमा होते. संयुक्त वन-व्यवस्थापनाअंतर्गत ह्याचे फायदे स्थानिकांना देण्याची व्यवस्था असली, तरी बहुतांश ठिकाणी ती कागदावरच राहिलेली आहे. एकूणच, दूरदृष्टीच्या अभावामुळे जंगलांचे फायदे केवळ आर्थिक निकषांवर आधारित आहेत व जैवविविधता, पाणी, जमिनीची धूप, निसर्गचक्र अशा बाबी पूर्णत: दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. ‘वर्ल्ड रिसोर्सेस इंस्टिट्यूट’च्या सर्वेक्षणानुसार जगातील पहिले चौदा जंगल-संपन्न देश हे सामायिक मालकीद्वारे जंगल राखणारे देश आहेत. काही संस्थांच्या सर्वेक्षणानुसार आपल्या देशातील सरकारच्या आधिपत्याखालील जंगलांतून मिळणारे उत्पन्न हे मेक्सिकोसारख्या देशाशी तुलना केल्यास १/६ इतके कमी आहे.

केवळ वनाधिकारासारखे कायदे करून ह्यामध्ये फरक पडणार नाही; तर, स्थानिकांना विश्वासात घेऊन, त्यांच्या क्षमता विकसित करण्यावर भर दिला गेला पाहिजे. त्या त्या प्रदेशाच्या परिस्थितीनुसार नियोजन, अधिकार व कार्यवाही करण्यासाठी संस्थात्मक गटांची स्थापना करण्याची गरज आहे. मेक्सिकोच्या उदाहरणातून भारताला बरेच काही शिकण्यासारखे आहे.

☯

## प्रतिसाद

□ ‘मेक इन इंडिया : लुटारूंसाठी पायघड्या’ ह्या संपादकीयातील विचार समर्पक आहेत. पण समाजाची परिस्थिती पाहता राजकारणी दुसरा कोणता विचार करू शकतात? पर्यावरण-संतुलन, ग्राहक चळवळ ह्यांसारख्या अत्यंत निकडीच्या कार्यात भाग घेणारे नागरिक किती टक्के असतील? *लग्न*, विविध उत्सव ह्यांवर होणारा खर्च व त्यांतील सहभागींची संख्या पाहता सामान्यांनाही सवंगताच हवी असे दिसते. आपल्यासारखी माणसे निरपेक्षपणे काम करीत आहेत, हीच दिलासा देणारी बाब आहे. आपण स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न करावा, हेच खरे.

*—डॉ. शरद प्रभुदेसाई, रत्नागिरी*

□ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४चा जोड अंक खूप आवडला. भूतान आणि क्यूबाबद्दल विशेष माहिती समजली. आपले ‘राजा कालस्य कारणम्’ हे संपादकीयही अतिशय आवडले. आता ‘जनता कालस्य कारणम्’ असे व्हायला हवे आहे, हे सत्यच आहे.

*—प्रेरणा खरे, बदलापूर*

□ भूतान व क्यूबाविषयीचे लेख फार आवडले. डिसेंबरच्या अंकातील ‘मेक इन इंडिया’ व ‘काय सोडणार अभियाना’बद्दलचे लेखही विचारोत्तेजक आहेत. कच्च्या तेलाचे भाव चांगलेच घसरल्यामुळे पेट्रोल-डीझेल स्वस्त होणे, ही पर्यावरणाच्या दृष्टीने चांगली बातमी नाही. दिल्लीतील नवे सरकार स्वत:ला प्रस्थापित करण्यासाठी मेक इन इंडिया, सोपे भूमी-अधिग्रहण, भरपूर कोळसा उपलब्ध करणे अशांसारखे निर्णय घेणारच. पाकिस्तानी उपद्रवामुळे संरक्षणावरचा खर्चही वाढणारच. त्यामुळे सध्या पर्यावरणाचा विचार होईल असे वाटत नाही.

*—डॉ. यशवंत केळकर, इंदौर*

## अखेरचा दंडवत

### आमचे अण्णा

दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ही व्यक्ती ‘पर्यावरण-वादी’ म्हणून कधीच गणली जाणार नाही. रूढ अर्थानं ते तसे नव्हतेही. ते माझे वडील. आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू. १४ फेब्रुवारीला त्यांचं निधन झालं.

सहा मुलं असलेल्या प्राथमिक शिक्षकाची आर्थिक स्थिती कशी असेल, हे वेगळं सांगायला नको. त्या ओढगस्तीतही आजोबांनी दोन्ही मुलग्यांना पदवीपर्यंत शिकवलं. शेतीची पदवी घेऊन अण्णा सरकारी नोकरीत रुजू झाले. वर्ग ३मधून वर्ग १पर्यंत पोहोचले. त्या प्रमाणात त्यांची आर्थिक स्थितीही सुधारली.

पण, आर्थिक सुस्थिती येऊनही अण्णांची राहणी कायमच साधी राहिली. घर साधं–वस्तू साध्या. आमच्या पुण्याच्या घरातला सोफा गेली ४५ वर्ष तोच आहे, अन् जेवणाचं टेबल-खुर्च्याही. त्या खुर्च्यांच्या पाठी आणि बैठका ठिकठिकाणी स्क्रू आणि चिकटपट्ट्या लावून अण्णांनी तशाच वापरल्या ठेवल्या आहेत. १९६२च्या पानशेत-पुरातून वाचलेली कॉट, स्प्रिंगचं घड्याळ, ट्रंका ह्या अजूनही वापरात आहेत. वस्तू जपून वापरणं; उगीचच खरेदी न करणं; उगीचच टाकून न देणं ही पर्यावरणीय तत्त्वं आहेत. पर्यावरणवादी असल्याचा टेंभा न मिरवता अण्णांनी ती जपली.

वर्ग १चे अधिकारी झाल्यावर अण्णांना किमानपक्षी स्कूटर घेणं तरी सहज शक्य होतं; पण, त्यांनी ती कधीच घेतली नाही. त्यांची महाविद्यालयात शिकत असतानाची सायकल होती, तीच ते वापरायचे. कधी कधी बसनंच कार्यालयात जायचे, नि येताना २।।-३ कि.मी. चालत यायचे. माझ्यावरही हाच संस्कार झाला, नि मी अजूनही ‘सायकलनिष्ठ’च आहे. पुण्यात आम्ही जिथे राहतो त्या उच्चभ्रूंच्या वस्तीत शंभरेक सदनिका वा बंगले आहेत. त्यांपैकी आमचं एकमेव घर असं आहे की, जिथे आजवर पेट्रोलवरचं वाहन घेतलं गेलेलं नाही!

पर्यावरणासाठीचं अण्णांचं परोक्ष कार्य म्हणजे त्यांनी अत्यंत चांगली राखलेली आपली प्रकृती. त्यांचा आहार, विहार, व्यायाम हे सर्व नियमित, मोजून-मापून असे. ते रात्री १० नंतर कधी जागत नसत, नि पहाटे ५ नंतर कधीही झोपत नसत. पुण्याहून कुडावळ्याला येण्यासाठी मला पहाटे ५।।ची विन्हेरे एस्टी आवडते. ती गाठण्यासाठी मी बरोबर ५ वाजता घर सोडतो. मी निघण्याच्या सुमारास आई झोपलेली असते; पण, गजर न लावता अण्णा मात्र उठलेले असायचे. त्यांचा स्वभाव काटकसरी होता; पण, अन्नाच्या दर्जाच्या बाबतीत मात्र त्यांनी कधी काटकसर केली नाही. धान्य, भाज्या, दूध, तूप : सर्व काही त्यांना चांगलंच लागायचं. ह्याचा परिणाम म्हणजे त्यांनी शेवटपर्यंत उत्तम राखलेलं आपलं स्वास्थ्य. ८८ वर्षात त्यांना एक दिवसही हॉस्पिटलात राहावं लागलं नाही. त्यांनाही नाही; अन् ८६ वर्षांत आईलाही नाही. त्यांना कोणतीही व्याधी नव्हती. ह्याचा सुपरिणाम असा की, कुडावळ्यात राहताना काय, किंवा व्याख्यानं-शिबिरांसाठी दौऱ्यांवर असताना काय : आम्हाला त्यांची चिंता नसायची. म्हणजेच, आम्ही गेली ३० वर्षे जे काही कार्य केलं, त्याला आईवडिलांनी त्यांचं स्वास्थ्य उत्तम राखून परोक्षपणे मदतच केली आहे, असं म्हणता येईल.

अण्णा घोषित पर्यावरणवादी नसतीलही; पण, स्वास्थ्यरक्षण, साधी राहणी आणि संयमित जीवनशैली ह्यांद्वारे कोणीही व्यक्ती पर्यावरणाचं कार्य करत नाही का? अन् त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे त्यांनी माझ्यावर केलेला तो संस्कार. अशा जीवनशैलीचं बीज आईवडिलांनीच तर माझ्या मनात, भले नेणिवेत का असेना, पण रोवलं ना? त्यातूनच तर पुढे हा सारा कार्यविस्तार झाला ना? अण्णा, इतर जे काही तुम्ही मला दिलंत त्याकरिता तर मुलगा म्हणून मी तुमचा कृतज्ञ आहेच; पण, त्याहूनही अधिक कृतज्ञ आहे तो ह्या साध्या राहणीच्या संस्काराकरिता.

आता विन्हेरे गाडीसाठी पहाटे घर सोडताना नमस्कार करायला तुम्ही नसाल; म्हणून हाच तुम्हाला अखेरचा दंडवत!

*—दिलीप*


### नव्या आवृत्त्या

❑ **हसरे पर्यावरण :** विद्यार्थ्यांसाठी संवाद-शैलीतलं पुस्तक।**९वी आवृत्ती**। *किंमत : रु.९०*

❑ **सौर आरोग्य :** व्यक्ती, परिवार, समाज आणि पर्यावरण ह्या स्तरांवरील आरोग्याचा एकात्म विचार।**४थी आवृत्ती**। *किंमत : रु.९०*

*प्रकाशक* : राजहंस प्रकाशन

*सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे उपलब्ध*


### सौर दिनदर्शिका

**सौर चैत्र, शके १९३७ (मार्च-एप्रिल २०१५)**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १ 22मार्च | २ 23 | ३ 24 | ४ 25 | ५ 26 | ६ 27 | ७ 28 |
| ८ 29 | ९ 30 | १० 31 | ११ 1 | १२ 2 | १३ 3 | १४ 4 |
| १५ 5 | १६ 6 | १७ 7 | १८ 8 | १९ 9 | २० 10 | २१ 11 |
| २२ 12 | २३ 13 | २४ 14 | २५ 15 | २६ 16 | २७ 17 | २८ 18 |
| २९ 19 | ३० 20एप्रिल | | | | | |


### गतिमान ☯ संतुलन

❑ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❑ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❑ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिना-अखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❑ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❑ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❑ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले.
संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)**

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३०
डाकघरातून; दरमहा दि.२१ला

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2015-2017
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना क्र. : WPP-13

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिट्ठीवरचा कालावधी **मार्च१५** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक कालावधी पर्यंत

**प्रति**

**प्रेषक** गतिमान संतुलन,
कुडावळे ४१५७१२,
ता. दापोली, जि. रत्नागिरी





पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002